# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

## Maharashtra Industrial Development Corporation

(A Government of Maharashtra Undertaking)

मुख्य कार्यालय : "उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३. प्रिन्सिपल कार्यालय : ४,४ (ऐ) १२ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर-१, कफ परेड, मुंबई ४०० ००५.

Head Office : "Udyog Sarathi", Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai 400 093. Principle Office : 4,4 (A), 12th Floor, World Trade Centre-1, Cuffe Parade, Mumbai-400 005.

☏:०२२-४७४८८३१२, ४७४८४६७९/९९ ☏: +९१-०२२-४०१६१४५१/५४ (022-40161451/54)

www.midcindia.org


जा.क्र. मऔविम/म.व्य.(भूमी)/ P-155850 दिनांक: 07/01/2025

## परिपत्रक

विषय: अपवादात्मक परिस्थितीत मुदतवाढ मंजुर करणेबाबत.

संदर्भ: (१) परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/कार्यासन-१/ए७१२२२, दिनांक ०६.०३.२०१३
(२) परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/मव्य(भूमी)/बी४३४२५, दिनांक २१.०४.२०१७

महामंडळाच्या संदर्भाधीन परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आलेल्या सुधारीत मुदतवाढ धोरणानुसार भूखंडधारकाच्या आवाक्याबाहेरील टाळता न येणा-या परिस्थितीमध्ये पुढील मुदतवाढ अथवा भूखंड विकासासाठी सुधारित अथवा नव्याने विनाशुल्क कालावधी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने देण्यात येतो.

संदर्भाधीन परिपत्रकांमध्ये नमूद अपवादात्मक परिस्थिती व्यतिरीक्त कोव्हिडमुळे उद्भवलेली परिस्थिती व त्यामुळे सद्य:स्थितीत निर्माण झालेली जागतिक औद्योगिक आर्थिक मंदी, यामुळे महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील उद्योगावर झालेला परिणाम त्याचप्रमाणे उद्योजकांचे स्वत:चे अथवा कुटुंबातील व्यक्तीचे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने निश्चित केलेले दुर्धर आजार (११ गंभीर आजारांच्या सुचीमधील आजार) तसेच नैसर्गिक आपत्ती (जसे पूर, वादळ, भूकंप इत्यादि) अशाप्रकारच्या कारणांचा समावेश करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने महामंडळाच्या परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/मव्य(भूमी)/बी४३४२५, दिनांक २१.०४.२०१७ मध्ये सुधारणा करण्यात येत असुन अपवादात्मक परिस्थितीत भूखंडधारकाच्या आवाक्याबाहेरील टाळता न येणा-या

परिस्थितीमध्ये (unavoidable circumstances / beyond the control of allottee) खालील बाबींचा समावेश करण्यात येत आहे.

(१) भूखंड विकासासाठी महामंडळाकडून किमान मुलभूत सोई-सुविधा पुरविल्या गेल्या नसणे (किमान मुलभूत सुविधा म्हणजे भूखंडापर्यंत पोहोच रस्ता असणे, विद्युत पुरवठा व ज्या उद्योगांस पाण्याची आत्यंतीक आवश्यकता आहे अशा उद्योगासाठी पाणी पुरवठा),

(२) बोजाविरहित भूखंडाचा ताबा देण्यास महामंडळ असमर्थ ठरणे,

(३) काही कारणास्तव मुळ खातेदार शेतकरी यांनी अडथळा आणल्याने सदर भूखंडावर पोहोचणे व त्याचा विकास करणे उद्योजकास शक्य न होणे, तथापि, सदर बाब संबंधित प्रादेशिक अधिकारी यांनी प्रमाणित करणे व संबंधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुष्टीकरण करणे आवश्यक आहे.

(४) महामंडळाने वाटप केलेल्या जागेवर इतर शासकीय विभागांचा ताबा असणे,

(५) नैसर्गिक आपत्ती (जसे पूर, वादळ, भूकंप इत्यादि), याबाबत सक्षम प्राधिका-याचे प्रमाणीकरण आवश्यक आहे,

(६) राज्य / केंद्र शासनाच्या धोरणांचा उद्योगावर झालेला विपरित परिणाम,

(७) संबंधीत क्षेत्रांबाबत मा. न्यायालय / National Green Tribunal यांचेकडुन विशेष निर्देश, स्थगिती किंवा जैसे थे आदेशामुळे (Special Order, Stay Order or Status Quo) झालेला विलंब.

(८) ज्या उद्योगांना पर्यावरण ना हरकत प्रमाणपत्राची (Environment Clearance) आवश्यकता असते, अशा उद्योगांना पर्यावरण विभागाचे ना हरकत प्रमाणपत्रासाठी शासनाकडून झालेला विलंब. तथापि, अशा उद्योजकांनी त्यांचा परिपूर्ण अर्ज पर्यावरण विभागाकडे वेळेत सादर केलेला असणे, तसेच पर्यावरण विभागाने कळविलेल्या त्रटींची पूर्तता वेळेत केलेली असणे आवश्यक आहे.

(९) उद्योजकांचे स्वतःचे अथवा कुटुंबातील व्यक्तीचे (महामंडळाच्या परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/का-२/३०५, दिनांक १९.०९.२००२, क्रमांक मऔविम/मुकाअ-भूविभाग/का-३/६२, दिनांक २३.०९.२००५, क्रमांक मऔविम/का-२/विधी व कामकाज/११, दिनांक १७.०४.२००७ आणि क्रमांक मऔविम/भूविभाग/का-१/बी७६४०८,दिनांक १६.०६.२०१४ अन्वये निर्धारीत करण्यात आलेल्या कुटुंबाच्या व्याख्येनुसार) दुर्धर आजारपण (महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक एमएजी २००५/९/प्र.क्र.१/आरोग्य ३, दिनांक

१९.०३.२००५ आणि शासन निर्णय क्रमांक वैखप्र-२०१९/प्र.क्र.२३६/राकावि-२, दिनांक २७.०३.२०२० मध्ये नमूद ११ गंभीर आजारांच्या सुचीमधील आजार)

(१०) याव्यतिरीक्त काही विशेष परिस्थितीमध्ये सादर करण्यात आलेल्या वस्तुस्थितीच्या आधारे अपवादात्मक परिस्थिती अंतर्गत विनाशुल्क मुदतवाढ मंजुर करण्याचे अधिकारी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असतील.

भूखंडधारकाने उपरोक्त कारणांमुळे भूखंडाचा विकास करुन उत्पादनात जाणेकरिता मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केल्यास सदर प्रस्तावास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पूर्वमान्यता घेऊन विनाशुल्क कालावधी मंजूर करण्यात यावा.

सदरहु परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

०६.०१.२५

(अनिल भंडारी, भाप्रसे)
सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन)
मऔविम, मुंबई

प्रत:

(१) सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
(२) अतिरीक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे / नांदेड / नागपूर
(३) महाव्यवस्थापक (भूमी / विधी / भूसंपादन / मा व तं / जनसंपर्क / म.ब.वि. / डीएमआयसी / पणन)
(४) सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम,
(५) सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम,
(६) सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम,
(७) सह / उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई / पुणे / औरंगाबाद / नागपूर.
(८) सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,
(९) सर्व औद्योगिक संघटना
(१०) मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती / मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ / जागतिक व्यापार केंद्र, मुंबई.